Sudam Shikshan Prasarak Mandal,

# Matoshri Nanibai Gharphalkar Science College, Babhulgaon.

## Annual Magazine - "Bharari"

## 2020-21

Matoshri Nanibai Gharphalkar Science College, Babhulgaon serves education under the guidelines of Sant Gadge Baba Amravati University, Amravati. Our college never fails to express our gratitude and teachings of Sant Gadge Baba.

## Ten Commandments of Sant Gadge Baba



# OUR INSPIRATION:



**Matoshri Nanibai Gharphalkar.**



**Late. Mr. Babasaheb Gharphalkar.**

# OUR PILLARS:





**Mr. Krushnabhau Kadu**

**Secretory.**

**Dr. Achyut P. Deshpande**

**Principal.**



THE CONSTITUTION OF INDIA

Preamble.

WE, THE PEOPLE OF INDIA, having solemnly resolved to constitute India into a SOVEREIGN DEMOCRATIC REPUBLIC and to secure to all its citizens:

JUSTICE, social, economic and political;

LIBERTY of thought, expression, belief, faith and worship;

EQUALITY of status and of opportunity;

and to promote among them all

FRATERNITY assuring the dignity of the individual and the unity of the Nation;

IN OUR CONSTITUENT ASSEMBLY this twenty-sixth day of November, 1949, do HEREBY ADOPT, ENACT AND GIVE TO OURSELVES THIS CONSTITUTION.

Signature of the artist Beohar Rammanohar Sinha as 'Ram'
अलंकरणकर्ता ब्यौहार राममनोहर सिंहा के संक्षिप्त हस्ताक्षर 'राम'



# अनुक्रमणिका:


| अ.क्र. | |
|---|---|
| १ | मनोगत |
| २ | प्राच्यार्याचा संदेश |
| ३ | संपादकीय मनोगत |
| ४ | About college |
| ५ | विद्यार्थ्यांच्या कविता, लघुलेख, लेख (कथा) |
| ६ | शिक्षकांची कविता |
| ८ | आंतरराष्ट्रीय योगा दिन |
| ९ | जागतिक पर्यावरण दिवस |
| १० | शिक्षक दिन |
| ११ | राष्ट्रीय विज्ञान दिवस |
| १२ | राष्ट्रीय वाचन दिवस |
| १३ | दीक्षांत सोहळा (२०२०-२०२१) |



# मनोगत ..........

बाभुळगांव तालुक्यातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे, या करीता मातोश्री नानीबाई घारफळकर विज्ञान महाविद्यालयाची स्थापना झालेली आहे. गोरगरीब व ग्रामीण विद्यार्थ्यांची शिक्षणाची गैरसोय होणार नाही हाच माझा प्रयत्न राहिला आहे.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी अनेक अडचनींना सामोरे जावे लागते. अनेक ग्रामीण भागात रस्त्याची सोय नाही, त्यामुळे पावसाळ्यात येण्याजाण्यासाठी अनेक अडचनींना तोंड द्यावे लागते. ग्रामीण भागातील रोडवर पडलेल्या खड्ड्यामुळे सरकारी वाहणे गावोगावी जाण्यास तयार नसतात, त्यामुळे खेडेगावातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची उपस्थिती ही कमी असते हे विचारात घेऊन मी लवकरच इथे महाविद्यालयाकरिता बसची व्यवस्था करून देणार आहे.

या पुढे विद्यार्थ्यासाठी आम्ही पोस्ट ग्रॅजुएशन व विद्यार्थ्यांसाठी खास शिक्षण म्हणजे गृहविज्ञानाची शाखा सुरू करणार आहोत व या सर्वाकरिता लागणारी एक भव्य व सुसज्ज इमारतीचे बांधकाम पूर्ण झालेले आहे.

या बाभुळगांव तालुक्यात मी जे रोपटे लावलं आहे त्याचे परिवर्तन वटवृक्षात होतांना आपण सर्व पाहतच आहात. तेव्हा या वटवृक्षाची सावली येथील जनतेला, गोरगरीब व गरजु, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा त्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे या करिता मातोश्री नानीबाई घारफळकर विज्ञान महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी प्रयत्नशील राहतील याची मी हमी देतो. विद्यार्थ्यांना पडणारे प्रश्न वा अडचणी माला सांगाव्यात जेणे करून मला आणखी परिवर्तन करता येईल. या करिता मी विद्यार्थ्यांना अपील करतो आहे.

**कृष्णाभाऊ कडू**

**प्राचार्य / सचिव**

## Principal's Message

It gives me an immense pleasure to write this message for it is a true outcome of the student's creativity.

We started giving a platform to the student's creativity through the Student's Board where the student can share their creation, in the form of poetry, essays, information, paper cutting, jokes, etc. The students used this platform from time to time and the response was stored and complied which resulted into the student's Magazine. The editorial board of the magazine took keen effort to make it to the proper shape and beautiful design. I congratulate the contributors and the editorial board for their nice work.

This magazine is an evidence of the fact that although our students are learning science subject only, their literary sense is equally high. With this, we have taken one more step towards achieving our goal of preparing our students for competitive challenges of future.

I wish the students to make the best use of this platform of Student's board and contribute to the magazine so that their views are broadened. Once again my hearty congratulations and best wishes to the readers, contributors and the editorial board for bringing out such a nice magazine.

Dr. A. P. Deshpande

Principal

## संपादकीय मनोगत

या वर्षाचा "भरारी" अंक विद्यार्थ्याचा हातात देतांना आम्हाला विशेष आनंद होत आहे, कारण नवनवीन विषयावर संग्रहणीय "भरारी" विशेषांक विद्यार्थी वाचकांना सादर करण्याची परंपरा "मातोश्री नानीबाई घारफळकर महाविद्यालयाने" सातत्याने जपली आहे व यासाठी वर्षाचा भरारी अंक विद्यार्थी वाचकांना निश्चितच आवडेल अशी आम्हाला आशा आहे.

आपला देश महासत्ता होण्याची महत्त्वकांक्षा उरत बाळगत असतांना आजचा विद्यार्थी भविष्याची ऊर्जा आहेत हे ध्यानात घेऊन त्याच्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी विद्यार्थ्यांच्या कला गुणांची मांडणी करण्याची संधी उपलब्ध करून देण्याचा उद्देश या भरारी अंक काढण्यामागचा आहे.

आज या भरारी अंकाच्या माध्यमातून विद्यार्थ्यंच्या कला गुण विकासाचे नवे पर्व सुरू झाले आहे. ज्याच्या माध्यमातून विद्यार्थी आपले काव्य, लेख, कथा, आकलने, निरीक्षणे मांडण्यास सुरवात झाली आहे. विद्यार्थ्यामध्ये नवी उमेद, ऊर्जा, प्रेरणा व लिहण्याचे मांडणी करण्याचे धाडस समाजमाध्यमातून निर्माण होत आहे. ज्याचा उपयोग विद्यार्थ्याला आपल्या भाविजिवनात शिक्षण घेताना कार्यकरतांना एक वैचारिक परिपक्वता येण्यास मदत होईल, अशी आशा "भरारी" अंकाच्या संपादक मंडळाला आहे. अंक तयार करण्यामध्ये मोलाचे योगदान श्री. विवेक ठवळे तसेच विद्यार्थी व शिक्षक, शिक्षेकेत्तर कर्मचारी यांचे लाभले, त्याबद्दल धन्यवाद !...

यू. ए. खडसे.

# About College:



The College was established in 2008-09 with an intention to provide good science education to the students of this backward rural area. The College Management aims at developing the College as an Institute to impart knowledge in every field of science with the best experimental facilities.

The College is located in an environment-friendly area with minimum sound, water and air pollution. Providing the basic infra structural facilities to the students, well-equipped laboratories are ready to enhance the experimental skill of the students.

Extra-curricular activities, games and sports, cultural and social activities help students' development as well as cultured citizen of the country having social awareness.

College website: www.mngsciencecollege.ac.in

College email: mng.babhulgaon@gmail.com

# तू सपना देख

क्योंकि तु जो है! वह होना भी किसिका सपना है!!

तू जो है तु वही रह

क्योंकि तु जो है वह होना भी किसिका सपना है!!

तू जैसा जी रहा हैं

उसे हस कर जी ए मुसाफिर!!

क्योंकि ऐसा जीना भी तो किसीका सपना है!!

परेशानी चाहे जितनी बडी हो

तू उसे हल करके आगे बढ़...

और तेरा यही आगे बढना भी तो किसिका सपना है!!

मंजिल तेरे पोहोचने का सपना देख रही है...

तू भी उसे पाने का सपना देख क्योंकी उसे पाना भी तो कसीका सपना है!!

ईस सपने की दुनिया मे कुछ यू खोजा ए मुसाफिर!!

की तेरी तरहा सपने देखना ही किसीका सपना देखना ही किसीका सपना बन जाए...

**आकांक्षा वर्मा**

**B.sc part 1**

# A Poem for My Mother

She is

My Love

My Best Friend

My Soul mate

She is the season I can face the hurdles of life

She is the reason I have

Sabr (patience)

She is the reason I have so much love to offer

She is the reason why allah has guided me

Towards the path of success

She is the reason I have the power of

Forgiveness

Even towards the dartest of evile

She is the guiding light who has led me from

The moment I first opened my eyes to this very nanosecond.

Heaven truly resides below her feet, and I could never even corn close to having the power of Love that she has.

She is my Angle

She is my everything

Love U Mom……..

**Mateen Ahmad Mohd Nurul Haque**

**B.Sc. Part 3**

# “चिंतन”, “मनन”,” विचार”

खूप आहेत प्रश्नांच्या छटा मनात!!

उत्तर भेटे ना कुठे

अशांत झाले मन.....

बघु हरवले कुठे ???

या धावपळीच्या जीवनात

शांतता हरवली कुठे ????

संसारिक आहे मी !!! पण !!!

परिवार आहे कुठे ???

परिवार आहे !!!! पण

एकत्रित येईल कधी ???? कुठे ????

आहे प्रश्नांचे जाळे महाग

मग उत्तर म्हणून आहे “चिंतन”

“मनन”, “विचार” .....

डोळे मिटूनि करावे चिंतन !!!

स्वतशी....

“चिंतन” हरेल “चिंता” तुमची

उत्तर मिळेल मनाशी

प्रथम विचार स्वतशी !!

मग स्वजनाशी....

करावे विचार - विनिमय आपुल्याशी

मिटेल काळजी काळाची , हरेल चिंता मनाची;

भावना जुळतील लोकांशी

आणि उत्तर मिळेल प्रत्तेकांची

आवश्यकता आहे फक्त

“चिंतन”, “मनन”, “विचारांची”

**आकांशा वर्मा**

# FACEBOOK SHOULD BE BANNED

**Facebook** social media platform have become a part of our everyday routine. One of the most popular social networking website is facebook. Some people use facebook to find family and old college or high school friends. We reconnect with people that we haven't communicated with in what seems like forever. Even businesses have found good results by advertising on this site. Obviously, many people find interest in using Facebook.

Facebook captures the users time with their engaging features and amazingly helpful options. When reasoning with younger generations, facebook is a form of communication and the beginning of new friendships and relationships. With 1.1 billion users, fcebook is the most social network present days.

Facebook is one of the most famous social media networks which have more than 500 million users. Of course, this network provides lots of opportunities to communicate and find new friends. However the tool is too imperfect.

In the first place, there were several scandals concerning the networks creators 'sharing' information. Reportedly, they sold personal information to the companies. The network's creators argued that users shared their information, so it meant the information was not confidential, likewise, almost anyone can find some personal information and use it.

The most vulnerable category of users is teenagers who may reveal their personal information to criminals without even understanding the potential danger. Therefore, facebook should be banned to prevent invasion and associated crimes.

## Advantages

Most people who know how to use a computer and internet have a profile on facebook. Facebook is also known or finding dates. Indeed, with a social network powered by over 1 billion active users, it's easy to find a date that shares common interests and hobbies. Finding dates in his way, much of the time you won't get into incompatibility issues.

## Disadvantages

One of the major concerns and disadvantages of facebook has to do with. In the past, it has created a lot of buzz due to sudden changes, but now facebook has simplified its privacy settings.

Another thing to consider has to do with the availability of really personal information, whether it's in video, pictures or text.

Here's good rule

Never give out too much personal information

All throughout the internet, we should always keep in the mind the privacy of our personal data.

After it's placed online, we lose all control.

Even though facebook has simplified its privacy settings, many unknowing users still end up publishing private images and status updated publically. Also, people usually keep their facebook friends list visible to the public, and this helps facebook stalkers to find more information about you. Facebook is full of fake profiles. There is no limit to these profiles most of them are created by stalkers or marketers looking it for their marketing purposes. Any online or offline business can leverage the power of facebook for business success.

**Devyani Bhuradkar**
**B.Sc. 1st year**

# मी सावित्री बोलतेय

एकोणीसाव्या शतकातील विदयादाईनी, एक युगंधरा जिने आपल्या पतीच्या साहायाने शिक्षणाची गंगोत्री असामान्य माणसाच्या घराघरात पोहचवण्यासाठी अविरत कष्ट सहीले. रूढी परंपरेच्या अंधारातून बाहेर काढून तुमचं आमचं आयुष्य सफल आणि सुफल होण्यासाठी जी अखंड चंदणासारखी झीजली कोण होती ती माऊली ? कोण होती ती ? जी लखलखणाऱ्या तेजाची सत्यशोधक क्रांती म्हणून आज ही ओळखली जाते.

ओळखलतं मला मी सावित्री ! माझ पुर्ण नाव सावित्री ज्योतीराव फुले. माझा जन्म सोमवार दि. ३ जानेवारी १८३१ जा नायगाव या गावी झाला. वयाच्या नवव्या वर्षी जोतीराव गोविंदराव  फुले यांच्याशी माझं लग्न झाल. हळूहळू माझ्या लक्षात आलं. ज्यांच्याशी माझं लग्न झालय तो निव्वळ सामान्य माणूस नाही. तर लाखो करोडांना ऊर्जा देणारा क्रांतीसूर्य आहे. १ जानेवारी १८४८ पुन्यातील भीडेवाडयात सर्व धर्मीय मुलींसाठी पहिली शाळा सुरू केली.

भारतीय माणसानं, भारतीय माणसांसाठी सुरू केलेली पहिली शाळा होती. आणि मी पाहिली शिक्षिका आणि मुख्याधापिकासुद्धा मीचं. शिक्षण हे दूध आहे वाधीणीचं हे वाघीनीचं दूध मी माझ्या लेकरांना देणार होते. शेपटासारख जंगलात तर काम तमाम होतं. वाघासारखं  जंगलात तर नाम होतं. कार्य खडतर होतं. चोखमीच होतं. पण शिवरायांच्या मावळ प्रातांतील मावळे आम्हीसुद्धा वंशच होतो. घाबरण किंवा कच खान आतच्या रक्ताला मोणवणार नव्हत. सनातण्यांची मात्र धर्म बुळाला, धर्म बुळाला म्हणून कोल्हीकोई सुरू होती. सर्वसामान्य माणसाने शिक्षण घेतल्याने कसा काय धर्म बुडतो, यांचा इतका तकला तो असू शकतो का तो धर्म धर्म माणसासाठी असतो की, धर्मासाठी माणूस, माणसाच्या प्रगती ही धर्म जात येते. माझ असं मत आहे देवाला मानत नं तुम्ही, देव आहे असं म्हणता नं मग हा जातीभेद का पाहता. देवांनीच आपल्याला निर्माण केलं आहे. जर देवानेच आपल्याला घडवण्यात भेदभाव केला नाही तर आपण कोण भेदभाव करणारे. रक्त तर सर्वांचं लालच आहे ना. मी जेव्हा मुलींना शिकवायला जायची, तेव्हा रस्त्यावरील लोक मला शेण, दगड फेकुन मारायचे वाटेल ते बोलायचे. पण मी का म्हणून ऐकणार होते मी ही त्यांना म्हटलं तुम्ही वाअेल तो त्रास दया मला पण मी माझ्या हातात घेतलेले चांगले काम मुळीच सोडणार नाही. हाच एक निश्चित होतो आणि मी चालत गेले. मला साथ देणारे माझो पती जोतीराव सोबत असलेल्यावर मला`शाची भीती आणि ते

म्हणते ना, चांगल्या कामाची लाज कशाला ? त्या काळी तर मुलींच्या नशीबी चुल आणि मुलंच होते. पण मी म्हणते कशासाठी ? देवाने नाहीतर आपल्या माणसाने बांधला आहे ते नियम. मुलगी शिकली की, उन्नती होते, प्रगती होते. पण त्या काळाच्या लोकांना काय माहिती. सगळे अंधकाराच्या समाजात जगत होते. होयमी सावित्री जोतिबा फुले बोलते...........

ज्या स्त्री जातीला समाजात स्थान मिळावे ती शिक्षणाने बहरून यावी, स्वत:च्या पायांवर ऊभी राहावी म्हणून मी त्याकाळच्या बुरसटेलल्या समाजा विरूध्द बंट पुकारले. एक स्त्री शिकली पुढे गेली तर संपूर्ण घरदार पुढे जाईल. बुरसटलेल्या विचारातुन तिची सुटका होईल अनिष्ट रूढी परंपरा ज्या स्त्रीवर लादल्या गेल्या होत्या त्यांचा अंत होईल, यासाठी मी स्त्री शिक्षणाच यज्ञ ऊभारला पण आज मला खरोखरचं मी केलेल्या कार्याची लाज वाटते.

पहिली कार्टी वीज कडाडली

छुसरी कपाळकरंटी धरणी दुभंगली

एका वंशाच्या दिव्यासाठी

स्त्रीनेच स्त्रीची भृण हत्या केली.

स्त्री जन्माची ही सुफल कहाणी......

म्ग संपूर्ण स्त्रीजातीला मी प्रश्न विचारते कुठे गेले तुमचे शिक्षण ? आज शिक्षीत होऊनही तुही बुरसटलेल्या विचारातच लपटलेल्या आहात. स्वत: स्त्री असून गर्भातल्या स्त्रीची भृणहत्या करता. समाजातल्या लोकांना पलटायले हवे. समाजाची विचारसारणी बदलायला प्रत्येकीने पुढे यायला हवे. भावी समाजव्यवस्थेचा विचार करून स्वत:हुन स्त्रीभृणहत्येचा कवरूद्ध शंख फुंकले पाहिजेत. आणि हे कार्य ज्या दिवशी तुम्ही हे कराल त्या दिवशी या सावित्रीचा जन्मदिन हा बालिका दिन म्हणून साजरा करजा.

धन्यवाद.....

**आकांशा ग. फुगे**

**बी. एससी. भाग २**

# मेरा हाल क्या है

मेरा हाल क्या है क्या कहे
अगर समझ सको तुम तो कहे

कुछ अनकहे से राज है
दिल भी अब नासाज है

अगर तुम कहो तो बोल दें
राज सारे खोल दें

सिर्फ मायुसिया है मेरे साथ चलो
अगर निभा सको तो हाथ दो

दफ़न कुछ जज्बात हैं
कुछ अन कही सी बात है

और मेरा हाल क्या है क्या कहे
अगर समझ सको तो कहे

**Mateen Ahmad Mohd Nurul Haque**

**B.Sc. Part 3**

# वेड मन

आनंदाला माझ्या आहे मर्यादेच पांघरूण
आणि दु:ख ठेवले आहे अजूनखाली झाकून
मन काही बाई जेव्हा सांगू काही पाहत
मन काही बाई जेव्हा बोलू काही पाहत
गप्प काही बोलशिल तर त्याला टाकते सांगून

अनोळखिशा रानवाटा पाय राहतात शोधत
पिसाट वारा गुपितवेड झाड राहतात सांगत
वेळ काय काळ काय भान सरून जात
किती रोखा वेड मन एकटचं गात राहत

**देवयानी भुरडकर**

**B.Sc. 1st year**

# पृथ्वीची आत्मकथा

कसे आहात मुलांनो ? ओळखले का मला ? मी तुमची आई पृथ्वी बोलतेय? आश्चर्य वाटलं ना ! मला बोलताना पाहुन पण मी तरी काय करू आज वेळंचं अशी आली आहे की, मला तुमच्याशी बोलावे लागत आहे. काय विचारता ! कुणामुळे ? तुमच्या मुळे ! वाढत्या लोकसंख्येमुळे . आधिच माझ रूप कसं आणि आता कसं. खरचं मलाच आश्चर्य वाटते.

आधिची पृथ्वी कशी होते. तूम्हीच म्हणायचे की, आमची पृथ्वी जण हीरवा शालु घेऊन नटलेली आहे. आता तर अगदी ऊलटच झालयं. माझं अंतरंग मला सतत म्हणत असते. की, आता तरी तु सावध हो, स्वत:च संरक्षण कर, स्वत:चा जीव वाचव, तुम्ही जी शेतात फवारणी करता खत देता. ते खत रासायनिक असते हे तर तुम्हालाच माहिती आहे. तुम्हाला तर पीके चांगल होतं पण माझा जीव गुदमरतो. इतकं सार रासायनिक खत मी माझ्या ऊदरात घेऊन राहते. माझं मला माहिती की, मी कशी सहन करते. तुम्ही स्वत:च्या स्वार्थासाठी जंगलतोड करता, वृक्षतोड करता म्हणून त्यामुळे सुर्याची जी कीरण आहे. ती येऊन मला भाजून टाकाते अजून सांगा कुठपर्यंत सहन त्रास होता. आपल्या स्वार्थासाठी दुसऱ्याला त्रास देणे कुठपत योग्य आहे बर ! एक गोष्ट विसरू नका, माझा नाश म्हणजेच तुमचा नाश, मी नष्ट तर तुम्ही नष्ट माझ्यासाठी नाहीतर स्वत:साठीच पर्यावरण संतुलीत ठेवा वृक्षतोड करू नका आता मला ही विनंती करते तुमचं रक्षण तुमच्या हातात आहे पर्यावरणाचा ऱ्यास होऊ देऊ नको. स्वत:ही सुखात व आनंदात राहा आणि मला ही आनंदाने राहुद्या.....

बस ऐवढच.............

**आकांशा ग. फुगे**

**बी. एससी. भाग २**

# कस जगायचं

आयुष्य जगणं ही एक कला आहे
कस जागायचं हे त्याच त्यांनी ठरवायच असतं.

दू:ख सगळ्यांनाच असतात
मग दु:खात दु:खाला सामोरं जायचं की पिचक
जगायच हे ज्याचं त्यांनी ठरवायच असतं

उद्याच्या चिंता ह्या सगळ्यांनाच असतात
पण उद्याची शाश्वती मात्र कोणालाच नसते
मग उद्यासाठी मरायच, की आपल्या आजच्या
दिवसामधील संपूर्ण आयुष्य जगायच
हे ज्याचं त्यांनी ठरवायचं असत.

समाजात जर आपल अस्तित्व टिकवायच असेल.
तर स्पर्धा ही अटळ आहे
पण ही स्पर्धा दुसऱ्याची आहे की स्वतःची स्वत:शी

हे ज्याचं त्यांनी ठरवायच असत

आयुष्यात सुखाचे चार क्षण येतात.
टिचभर सुखात सुख मानायच की ते
सुख वाटून वाढवायच
हे ज्यांचं त्यांनी ठरवायचं असत

प्रत्तेक सामान्य माणसामध्ये काहीतरी
असामान्य असतच
मग सामान्य म्हणून जगायच की असामान्य म्हणून
हे ज्याचं त्यांनी ठरवायच असत

**देवयानी भुरडकर**

**B.Sc. 1st year**

# आग्नेयेचे निसर्गरंग

# नेलापटटू आणि पुलीकत

भारतात अनेक अभयारण्य आहेत की जी अजूनही मोठ्या प्रमाणावर प्रसिध्द झालेली नाहीत. पण त्यांचं सौंदर्य इतर जंगलांच्या तुलनेत काही कमी नाही. काही ठिकाणी तर तिथली विविधता, निसर्गसौंदर्य हे केवळ अतुलनीय आहे. पण आजही जंगल म्हणली की लोकांच्या डोळयासमोर येतात ती कान्हा, बांधव गड, ताडोबा, जिम कॉबेंट अशी नावाजलेली जंगल देशाच्या प्रत्येक भागात आपण गेलो तरीही आपल्या निसर्गाचा तितकाच आनंद देणारी जंगल आहेत. काही दिवसांपूर्वी आपण उत्तरेचे विहगगान बधितले, कॉबेट, दुधवासारखी उत्तर भारताच्या सौंदर्याला चार चांद लावणारया जंगलांची माहिती घेतली अगदी ईशान्येकडील जंगलाचाही माहीती घेतली. मध्य भारताच्या जंगलातही फेरफटका मारला. पश्चिम भारतातील रणथॅबोर सारखा जंगलांचीही सफर केली दक्षिण भारतातल्या काही जंगलांचं सौंदर्य वाचनातून अनुभवल.

भारताच्या आग्नेय भागातील निसर्गाचं सौंदर्य ही असचं सुरेख आहे. इथल्या जंगलात फिरताना, इथली जैवविविधता अनुभवतांना देखील निरळा आनंद मिळतो. भारताच्या अनेक भागात पक्षी स्थलांतर करुन येतात काही कालावधीसाठी तिथे वास्तण्य करतात आणि पुन्हा आपल्या मूळ स्थानी परतात. हे चक्र गेली अनेक वर्षे सुरु आहे.आणि ही किया दरवर्षी पाहायला मिळते. काही पक्षी भारताच्या किणारपटटीच्या भागात असणारया अशाच दोन पक्षी अभयारण्यांविषयी आपण आज माहीती देणार आहोत.ती म्हणजे 'नेला पटटू पक्षी अभयारण्य' आणि 'पुलकीत पक्षी अभयारण्य

आकाराने छोट असलेले नेलपटटू पक्षी अभारण्य अनेक प्रजापतीच्या स्थानिक आणि स्थलांतरित पक्ष्यांचे आश्रमस्थान आहे. पूर्वी जेव्हा अभयारण्याचा दर्जा या अधिवासाला मिळाला नव्हता अगदी तेव्हापासून इथे पक्षी मोठ्या संख्येने आहे इथल्या स्थानिक लोकांच्या म्हणण्याप्रमाने गेली चार ते पाच दशके येथे हजारोंनी पक्षी येतात.काही इथेच वास्तव्य करतात तर काही येथून स्थलांतर करतात. आंध्र प्रदेश राज्यातील नैल्लोर जिल्हातील सुल्लुरुपेटा तालुक्यात असणारे हे अभयारण्य म्हणजे पक्षी निरीक्षकासाठी आणि निसर्ग प्रेमासाठी स्वर्गच.

पक्ष्यांच्या दृष्टीने या अधिवासाचे असलेले अनन्यसाधारण महत्व लक्षात घेऊन सुमारे ४५८.९२ हेकटर भागाला १९७६ साली नेलापटटू पक्षी अभयारण्यांच्या एकून भागाच्या

सुमारे२८८.१५ हेकटरचा भाग हा कल्लुर राखीव पनाचा आहे. सुमारे ८२.५६ हेकटर भागात नेलापटटू तलाव आहे आणि उर्वरित सुमारे ८८.२२ हेकटर जंगल भाग हा पुर्वी असरक्षित वनांचा होंता, तो आता अभयारण्यात समाविष्ट करण्यात आला आहे सुमारे १ हजार मिलीमीटर पाऊस दरवर्षी या भागात होतो. आणि हा पाऊस या तळयाला असणारा पाण्याचा मुद्य स्त्रोत आहे. मे महिन्यात या तलावातील पाणी कमी होते. नेजरपटटू गाावातले लोक पाण्याचा साठा कमी होतो. याच कालावधीत इथे असणारे पाणपक्षी दुसरीकडे स्थलांतर करतात.

इथे असणारे स्थानिक लोक इथल्या पक्ष्यांच्या सांक्षणासाठी आग्रही आहेत आणि तभा प्रयत्न करतात. त्याच्या मनाप्रमाणे हे पाणपक्षी येथे येणे हे चांगल्या हवामानाचं चिंन्ह आहे. पक्षी वेळेवर येथे दाखल झाले की त्या वर्षी पाऊस चांगला पडतो, पिक चांगल्या प्रमाणावर येते असा त्यांना विश्वास आहे. या पाणपक्षांनी विष्ठा हे स्थानिक लोक आपल्या शेतात खत अजूनही वापरतात. इथल्या पाणपक्ष्यांच्या संरक्षणात असलेला स्थानिक लोकांचा सहभाग हो या अभयारण्याची अत्यंत जमेची बाजू. स्पॉट विल्ड पेलिकन अर्थात ठिपक्याचा चांचांचा झोळांवाला हा येथे दिसणारा अत्यंत महत्त्वाचा पक्षी इथे या पक्ष्याचा मोठया वसाहती आढळून आल्या आहेत. विणिसाठी हे पक्षी इथे येतात त्यामुळे या पक्षी अभयारण्याला या पक्ष्याच्या विणिच्या अधिवासाचा दृष्टीने अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले.

पक्ष्यांच्या अधिवासाच्या दृष्टीने या भागातील दुसरे महत्त्वाचे अभयारण्य म्हणजे ‘पुलीकत पक्षी अभयारण्य’, आंध्र प्रदेशातील नेल्लोर जिल्हयात आणि तामिळनाडू मधील तिरुवल्लूर जिल्हयात हे अभयारण्य आहे. सुमारे ७५९ चौरस किलोमीटर एवढा मोठया भागात पसरलेले हे पक्षी अभयारण्य भारतातील चिल्का सराकवरानंतरचे दोन नंबरचे खाऱ्या पाण्याचे सरोवर आहे. एकून क्षेत्राच्या ८४ टक्के भाग हा आंध्र प्रदेशमध्ये तर १६ टक्के भाग हा तामिळनाडूमध्ये मोडतो. ग्रेटर फलेमिंगो, स्पॉट विल्ड पेलिकन, सौगल अशा अनेक पक्ष्यांच्या अधिवासासाठी प्रसिध्द असलेल्या या पक्षी अभयारण्याला भेट देण्यासाठी मोठया संख्येने निसर्गप्रेमी देश—विदेशातून येत असतात.

नोव्हेंबर ते फेब्रुवारी या कालावधीत येथे हजारो स्थलांतरित पक्षी येतात. या कालावधीत येथे त्यांची स्त्रोत होते. या सरोवरात असलेली २० बेटं ही या पक्ष्यांच्या वसाहतीचे मुख्य ठिकाण याच बेटांमध्ये एक प्रसिध्द ठिकाण म्हणजे श्रीहरीकोटा बेट आहे.

भारताला लाभलेला निसर्ग, इथली जैवविविधता, नेलापटटू, पुलीकत सारखी अभयारण्य वाचवण हे आपल्या सर्वाचंच कर्तव्य आहे. निसर्ग वाचला. टिकला तरच आपण वाचू हे लक्षात घेतल आणि त्याचप्रमाणे पावलं उचलली तरच संपूर्ण मानवाला मानवजात आपण वाचवू शकू. निसर्गात असलेल्या विविध रंग पाहण त्याचा आनंद आस्वाद घेणे आणि

निसर्गाच्या या खजिन्यात आनंद लुटतांना त्यात हरवून जाण हे केले तर निसर्गाची भाषा आपल्या सहज उमजेल आणि त्याला वाचण्याची गुरूकिल्ली सहज सापडेल यात शंका नाही.

छोटा टिलवा, शेकोटया तपकिरी डोक्याचा कुरव, सामान्य सुरप, छोटा खडया पाडून्या छातीचा खंडया, काळया टोपोचा स्त्रोवर, मोठया रोईल, छोटा बगळा, मोठा बगळा, राखी बगळा, मालिन बदक निरनिराळया प्रजातीचे बदके इ...

**अंजली एस. दरणे**

**B.Sc. part 1**

# वेड

कधी कधी मन उदास होत
नको त्या गोष्टीचा ध्यास घेत
जिथ काही नाती, तिथ जग पाहत
आणि वेड मन असाच वेड होत......

समजावुनही समजत नाही
आणि कारण शोधूनही मिळत नाही
भरल्या जगत मग मन एकटं होत
आणि वेड मन असचं वेड होत.......

जिथ जगाची रीत नाही
आणि समाजाचं भानही नाही
असा विश्वात हे वावरतं
मृगजळाच्या मागे धावत धावतं
वेड मन असचं वेड राहत........

**देवयानी भुरडकर**

**B.Sc. 1st year**

# <u>अपूर्ण प्रेम कायं शिकवून जाते..?</u>

**प्रेमाची ही गोष्ट वेगळी**

**कधी पूर्ण कधी अपूर्ण चं रहाते**

**पण प्रेमाची ही गोष्ट आपल्याला**

**खूप काही शिकवून जाते...**

प्रेम...! आयुष्यात कधी ना कधी आपण कुणावर तरी जीवापाड प्रेम करतो आणि काहीवेळा ते प्रेम आयुष्यभर आपल्या सोबत रहाते तर काहीवेळा त्या प्रेमाचा प्रवास एका विशिष्ट ठिकाणी येऊन संपतो.

या अपूर्ण प्रेमावर, प्रेमकहाणी वर कितीतरी चित्रपट, गाणी देखील आहेत. मगं प्रेम एकदा झाले की पुन्हा होतं नाही असे म्हणून कित्येक जण त्या अपूर्ण प्रेमाला कवटाळून बसलेले दिसतात आपल्याला इथे तर काहीजण आयुष्यात पुढे ही जातात.

पण ते प्रेम करतात आणि मला ही वाटते की माणसाने आयुष्यात एकदातरी प्रेम करावेच कारण ते प्रेम पूर्ण होवो किंवा अपूर्ण राहिले तरीही प्रेम आपल्याला खूप काही शिकवून जाते.

अपूर्ण राहिलेले प्रेम कायं शिकवून जाते असाही प्रश्न पडेल मगं काहींना. अपूर्ण प्रेम खूप काही शिकवून जाते.

अपूर्ण राहिलेले प्रेम आपल्याला स्वतःच्या अधिक जवळ आणते, जगण्यासाठी एक नवी दिशा देऊन जाते.

**हितेश दुधनकर**

# ऐ जिंदगी

पत्थरो के शहर मे कच्चे मकान कौन रखता है
आजकाल हवा के ल्ये रोशंडण कोन रखता है......

अपने घर की कलह से फुरसत मिले....तो सुने...
आजकल पराई दीवार पार कान कौन रखता है.....

जहां, जब, जिसका, जी चाहा थुक दिया
आजकल हाथों मे पिकदान कौन रखता है......

खुड ही पंख लगाकर उडा देते है चिडियो कों
आजकल परिन्दों मे जान कोण रखता है.......

बहलाकर छोड आते  है वृद्धाश्रम मे मा बाप कों
आजकल घर मे पुराना सामान कौन रखता है.......

**देवयानी भुरडकर**

**B.Sc. 1st year**

# लघुकथा

आज्जी सांगायची डोंगरा आड गेलेला माणूस परत येतो.

ढगा आड गेलेला माणूस परत येत नाही.

का कोणास ठाऊक माणसं न सांगता भराभर सोडून चाललीत ...

कित्येक स्वप्न, परिवार, चिल्ले-पिल्ले, घर-दार सोडून.

दूर ढगाआड !!

कायमची.

माणूस गेल्यानंतर माणसं हळहळ करतात. पण हयात असताना हीच माणसं एकमेकांना छळतात.

सत्ता, संपत्ती, अहंकार, ईर्ष्या, स्पर्धा सगळं किती क्षणिक आहे याचा इतका अनुभव यापूर्वी कधी आला नसेल.

आपले प्राधान्यक्रम चुकले आहेत.

एकमेकांत स्पर्धा करता करता जगण्याशी स्पर्धा झाली.

नको त्या गोष्टीना नको तितकं महत्व देणारी, किरकोळ अहंकारासाठी बोलणं सोडणारी माणसंच आहेत.

माणसाचा क्षणाचा भरोसा राहिला नाही.

फुलपाखरा सारखं क्षणभंगुर जगणं झालंय.

त्यामुळे माणूस माणसात असेपर्यंतच माणसांनी माणसाशी माणसासारखंच वागलं पाहिजे.

मी का माघार घेऊ ?

मी का फोन करू ?

मी का कमीपणा घेऊ ?

हे सगळं सोडून आधार, धीर, आनंद दिला-घेतला पाहिजे.

माणूस गेल्यानंतर आपण त्याचं कितीही कौतुक केलं, स्टेटस ठेवलं, रडलो तरीही तो ते कधीच पाहू शकत नाही की त्याला कोणी सांगू ही शकत नाही.

- **<u>सागर काळे</u>**

# कोरोनाचे थैमान

आपली बिल्डिंग असेल किंवा गाव असेल, हल्ली तर सगळीकडेच कोरोणाचे पेशंट्स भेटत आहेत, आणि तेपण खूप प्रमाणात, पण जेव्हा एखाद्या बिल्डिंग मध्ये एखाद्या घरात एक व्यक्ति पॉजिटिव भेटते, त्यांना हॉस्पिटल मध्ये नेल जात, त्यानंतर त्यांच्या घरावर जे दु:ख कोसळत ते कोणीच सांगू शकत नाही.

थोडी भीती वाटते की आपल्या जवळच एक पॉजिटिव व्यक्ति भेटला आहे, पण याचा अर्थ असा होत नाही की तुम्ही त्यांच्याशी बोलणं टाकुन द्याल, त्यांना दुर्लष्य कराल, त्यांना वाळीत टाकून द्याल, त्यांना एक फोन सुद्धा लावणार नाही, का तर ते कोरोना चे पेशंट् आहेत म्हणुन..........

मग तुम्ही शेजारी राहून तुमचं काय फायदा यार, त्याच वेळेला तर त्यांन आधाराची गरज असते, मोटिवेशनची गरज असते, तुम्ही भेटू नाही शकत, पण एक साधा कॉल करून तरी बोलू शकता ना, काय पाहिजे का ? काही आणून देऊ का? एवढं बेसिक तार विचारू शकता ना, गोष्ट पैंशांची नाही यार, पण जर एवढ्या कठीण परिस्थितित तुम्ही त्यांना साध एक्क कॉल करून बोलू शकत नाही तर काय उपयोग मग शेजारी असून तुमचा.......

प्रतेकावर कधी न कधी तरी वेळ येते हे, लक्षात ठेवा, जेव्हा हे सगळं स्वतः सोबत होत ना, तेव्हा मग कळतं, किती वाईट वाटत ते, जेव्हा कोणी साधी विचारपूस सुद्धा करत नाही. त्यांना पण तुमच्या कडूनच काही अपेक्षा असतील न की मला माहिती आहे हे आमच्यासोबत असतील नेहमी, त्यांच्या विश्वास कधी तोडू नका कारण तुम्ही जसे लोकांसोबत वागता तसेच लोक तुमच्यासोबतही वगतील.........

विनंती करते की आजुबाजूला, बिल्डिंग मध्ये तुमच्या कोणी पॉजिटिव असेल तर, बाकी काही नाही एक कॉल करून विचारपूस नक्की करा.

**देवयानी भुरडकर**

**B.Sc. 1st year**

# माणूस म्हणून ...!!

माणसांनी माणसाला भेटावं माणूस म्हणून...

चेहऱ्यावरचे कैक मुखवटे बाजूला काढून,

फुकाच्या बढायांचे, फेका-फेकीचे अस्त्र घरी ठेऊन,

अहंकाराच्या चपला दूर कुठे बाहेर फेकून,

जात, धर्म, सौंदऱ्याचा दर्प खोल गाडून,

सत्ता, संपत्ती, पदाच्या माजातून बाहेर येऊन ...

ऐकलेले, पाहिलेले सगळे पूर्वग्रह सोडून ...

माणसांनी माणसाला भेटावं फक्त माणूस म्हणून...

धुवून जाव्यात, वाहून जाव्यात या गोष्टी पहिल्या पावसात आलेल्या भयंकर पुरासारख्या ....

खाली रहावी ती निखळ माणूसपनाचा झरा घेऊन खळखळ वाहणारी स्वच्छ नदी...

दिसावा तळ त्यात मनाचा.

माणसांनी माणसाला भेटावं माणूस म्हणून ...!!

- **सागर काळे**

- **B.Sc. 2nd year**

# सुशांत सिंह राजपुत

किसी के पास शकल है किसी के पास अकल है,
जिसके पास दोनो वही आब बैता हुया कल है.
वो तो गया गया आपणी मासूमियतभी ले गया,
सितारा बनने आया था वो तारा बन गया .

नही निभया गया उसके साथ कला का **पवित्र रिश्ता**
शायद इसीलीये चला गया भगवान का वो फरीश्ता
पहली बार नजर आया फिल्म मे **काई पो छे**
पर फिल्मी दुनिया मे उसे कोई न पुछे.

धोनी की अनटोल्ड स्टोरी सबको बता गया
पर अपनी दर्द भरी कहाणी युहि दबा गया
थोडे ही वक्त मे उमदा किरदार निभा गया
सितारा बनने आया था वो तारा बन गया .

हारा नही था वो बस्स कुर्बान होकर औरो की जान बचाई

शायद केदारनाथ ही थी उसकी असली सच्चाई
उसके साथ साथ उसकी मुस्कराहाट भी चली गई
जिसे बरकरार रखने मे मा बाप की जिंदगी निकाल गयी

कुछ तो इशारा कर राहा था हमे छिंछोरे से वो
हम समझ नही पाए की अपनी ही व्यथा सुना रहा था वो
हर व्यक्ति को दुसरो का ख्याल रखना सीखा गया
सितारा बनने आया था वो तारा बन गया

क्यु बस्स मौत बन गया था असका आखरी चारा
क्या थोडा भी अपनापण ना ढुंढ पाया असका दिल बेचारा
अपनो का सोचकर थोडा और बन जरा मजबूत
तो आज हमारे संग होता सुशांत सिंह राजपुत

**देवयानी भुरडकर**

**B.Sc. 1st year**

# आयुष्याचं संघर्ष

अवघे हे अनमोल जीवन
नको रे घालवू वाया कुठ पन

तु ही हरणार तु ही जिंकणार
परंतु काळापाई नको घेऊ माघार

चल उठ आणि कर जीवन यशस्व
यातच आहे सौख्य आणि समाधानाचे वास्तव्य

आयुष्य आहे रे हे जगावं तर लागणारच
स्वत:ला नाही पण इतरांना पाहावं लागणारच

जीवन हे संघर्ष च झालंय
इथे माणसातील माणूस हरवलाय

~ हितेश दिलीप दुधनकर

# अभी इस तरह न निगाह कर,
# मै गजल की पलके संवार लू |

अभि इस तरफ न निगाह कर, मै गजल की पलके संवार लू |
मेरा लफ्ज लफ्ज हो आयना, तुजे आयिने मे उतार लू |

मै तमाम दिन का थका हुया , तू तमाम शब का जगा हुआ,
जरा ठहर जा इसी मोड पऱ, तेरे साथ शाम गुजार लू |

अगर आसमा की नुमईशो मे, मुझे भी इजने - कयाम हो |
तो मै मोतीयों की दुकान से, तेरी बालिया, तेरे हर लू |

कई अजनबी तेरी राह के, मेरे पास से यु गुजर गए |
जिन्हे देख कर ये तडप हुई, तेरा नाम ले के पुकार लू |

**देवयानी भुरडकर**

**B.Sc. 1st year**

# लघुकथा

आपल्या संपर्कात जास्त लोकं नसले तरी चालतं.

पण जे आहेत ते चांगले असावेत.

बऱ्याचदा आपलं जितकं नुकसान आपले शत्रू, विरोधक करत नाहीत, करू शकत नाहीत.

त्याच्या कैक पट जास्त नुकसान हे जवळचे, मित्र, नातेवाईक करतात.

कारण आपली कमजोरी/मजबुरी यांना जास्त माहीत असते.

बऱ्याचदा आपल्याला खड्ड्यात घालणारे, वाईट मार्गाला लावणारे, आपली बदनामी करणारे, आपला बाजार उठवणारे, आपल्याला संकटात टाकणारे हे जवळचे असतात.

अलीकडच्या काळात देश अन राज्य पातळीवरच्या काही मोठ्या लोकांना अडचणीत आणणाऱ्या गोष्टीचा आपण बारकाईने विचार केला तर त्या त्यांच्या जवळच्या लोकांनीच केल्याचं दिसून येईल.

इतिहासात सुद्धा संतापासून

राजा-महाराजां पर्यंत अनेकदा अनेकांचे पराभव हे परकीयांच्या बळापेक्षा स्वकीयांच्या फुटीरते मुळे झाले आहेत.

त्यामुळे दोनशे लोकांपेक्षा दोनच लोकं जवळ असावेत पण विश्वासाचे ...

ज्यांच्या रक्तात गद्दारी नसेल.

**सागर काळे**

**B.Sc. 2nd year**

# बाबा

वडील, बाबा, पप्पा, डॅडी, पिता, लिहण्याला, बोलण्याला खूप चांगल वाटते. पण आपण प्रत्येकजन सहजपणे नेहमी जाणूनबुजून शब्द ऊच्चारतो तो म्हणजे बाप! व्हयं बाप त्याच बापाविषयी थोडफार,

आई घराच मांगल्य असते, तर बाप घराच अस्तित्व असते. पण घराच्या अस्तित्वाला आम्ही घरचं समजून घेतलय का? वडीलाला महत्तव असुनही त्यांच्या विषयी जास्त बोलल्या जात नाही लिहल्या जात नाही. कोणताही व्याख्याता त्यांच्या विषयी जास्त बोलत नाही, लिहत नाही. कोणत्याही व्याख्याता आई विषयी जास्त वेळ बोलत राहतो. संत महात्म्यांनी आईचं महत्व अधिक सांगितलं आहे. देवादिकांना आईचेच तोंडभरून कौतुक केले आहे. चांगल्या गोष्टींना आईचीच उपमा दिली आहे. पण बाबाविषयी कुठचं जास्त बोललं जात नाही.

काही लोकांनी बाप रेखाटला तो ही तापट, व्यसनी, मारझोड करणार. समाजात एक दोन टक्के असे बाप असतील ही पण चांगल्या पित्यांबद्दल काय? चांगल्या गोष्टीबद्दल, चांगल्या वडीलांबद्दल काय? आईकडे अश्रृंची पाट असते तर वडीलांकडे संय्यमाचे घाट असते.

आई रडून मोकळी होते पण मात्र सांत्वन वडीलांनाच कराव लागते. आणि रडणाऱ्यांपेक्षा सांत्वन करणाऱ्यावर जास्त ताण पडतो. कारण ज्योतीपेक्षा समईच जास्त तापते ना! पण श्रेय नेहमी ज्योतीलाच मिळते. रोजच्या जेवणाची सोय करणारी आई नेहमी आमच्या लक्षात राहते. पण

आयुष्याच्या शिदोरीची सोय करणारा बाप किती सहज आम्ही विसरून जातो. आई रडते पण वडिलांना रडता येत नाही. स्वत:चा बाप वारला तरी रडता येत नाही. कारण छोटया भावंडांना जपायचं असतं. आई गेली तरी रडता येत नाही कारण बहिनींना आधार द्यायचा असतो. पत्नी अर्ध्यावर सोडून गेली तरी पोरांसाठी अश्रृंना आवर घालावा लागतो. जिजाबाईंनी शिवाजी घडवला असं अवश्य म्हणावं. पण त्यावेळची शहाजी राज्यांची ओढताण ही लक्षात घ्यावी. देवकीच यशोदेचं कौतुक अवश्य करावं. पण पुरातुन डोक्यावरून घेऊन जाणारा वासुदेव लक्षात ठेवावा. राम हा कौसल्येचा पुत्र अवश्य असेल. पण पुत्र वियोगात तडफडून प्राण त्यागणारा पिता दशरथ लक्षात ठेवावा. वडीलांच्या टाचा झिजलेल्या चपला पाहिल्या की त्यांच प्रेम कळतं. त्याची फाटकी बनियान पाहिली की, कळतं बामच्या नशीबाचा भोग त्यांच्या बनियानला पडली आहे. त्यांचा दाढिवाढलेला चेहरा त्यांची काटकसर दाखवतो. मुलीला गावून घेतील, मुलाला पॅट घेतील पण स्वत: मात्र जुनी पॅट वापरायला काढतील. मुलगा सलुनमध्ये वीस पंचवीस रूपये खर्च करतील, मुलगी ब्युटीपार्लरमध्ये तीसेक रूपये खर्च करते. पण त्याच घरातला बाप दाढीचा साबन संपला की अंगोळीच्या साबनीने दाढी करतो. अनेकदा तो नुसता पाणी लावून सुद्धा दाढी करतो. बाबा आजारी पडले तरी पटकन दवाखाण्यात जात नाही. ते आजाराला मुळीच घाबरत नाही. पण डॉक्टर एखादा महिना आराम करायला लावतील त्याची त्यांना भिती वाटते. कारण पोरीच लग्न, पोरांच शिक्षण बाकी असतं घरात ऊत्पादनाचं दुसर कुठलचं साधन नसते. ऐपत नसते तरीही मुलाला मेडीकल इंजिनियरींग ला प्रवेश मिळवून दिला जातो. ओढाताण सहन करून त्या मुलाला दर महिन्याला पैसे पाठवले जाते. काही मुलं असे असतात प्रत्येक महिन्याच्या

तारखेलाच पैसे येताच मित्राला परमिट रूपमध्ये पार्टी देतात. आणि ज्या बापांनी पैसे पाठवले त्याच बापाच्या नावाने एकमेकांना हाक मारतात. वडीलांची टिंगल करतात. आई घराचं मांगल्य असते. तर बाप घराचं अस्तित्व असत. त्या घरात बाप आहे. त्या घरात वाईट नजरेने कोणीही बघु शकत नाही. कारण घरातला कर्ता जिवंत असतो. तो जरी काही करत नसला तरी तो त्या पदावर असतो. आणि घरच्यांना सांभाळत असतो. कोणाचा मुलगा होनं टाळता येते पण कोणाचा बाप होनं टाळता येत नाही. आईच असण्याला किंवा आई होण्याला बाबामुळे अर्थ असतो. कोणत्याही परिक्षेचा निकालावर उत्तीर्ण झालं की, आई जवळची वाटते. कारण आई जवळ घेऊन कौटाळते कौतुक करते. पण गुपचूप जाऊन पेढयाचा आणणोर बाबाच असते. पहिलीट करणीच खूप कौतुक होते. पण हॉस्पीटलाच्या आवारात अस्वस्थपणे वावरणारे बाबाची कुणीही दखल घेत नाही.

चटका बसला ठेच लागली, फटका बसला तर आई गं...! ळा शब्द बाहेर पडतो. आणि हायवेला रस्ता ओलांडताना एखादा ट्रक जवळ येवून ब्रेक अचानक लावला तर बापरे...! हाच शब्द बाहेर पडतो. कारण छोटया–छोटया संकटांना आईचं चालते, पण मोठीमोठी वादळे बाबाचं आठवते. पटतयं ना....! माझं तुम्हाला कोत्याही मंगल प्रसंगी घरातील सर्व मंडळी जातात. पण मरण्याच्या वेळी बाबालाच जाव लागत. कोणताही बाप श्रीमंत मुलीच्या घरी जात नसतो. पण गरीब लेकाच्या घरी ऊभ्याऊभ्या का होईना चक्कर मारतो. तरूण मुलगा ऊशीरा घरी येतो. तेव्हा त्याची आई नाही बाबाच जागे राहते. असे असते वडील. आपल्या कुटूंबासाठी सतत झटणारे. बाबाविषयी जितके बोलावे तितके कमीच आहे. माझे बाबा देखील असेच आहे. स्वत:च

दु:ख विसरून कुटूंबाच्या आनंदासाठी हसणारे, स्वत:च ऊपाशी राहून दुसऱ्यांना जगवणारे, काही मुलं म्हणतात की, माझे बाबा माझ्यावर प्रेम करत नाही, नेहमी रागवत असतात.पण त्या रागवण्यामागे त्यांच प्रेम लपल हे दिसत नाही. मला माझे बाबा खुप आवडते आणि आई पण… ..

I love my Aai Baba……

**आकांक्षा गजाननराव फुगे**

**बी.एससी.भाग २**

# “वादळ वाटा”

आयुष्याच्या अंधार वाटा
नसे कुणी सोबती
वैर नसे अंधाराशी
घट्ट नाते जडती !!

वाटेवरी काटयांना कुणी
नसे सोबती
साथ देईल का अंधारा
चांदण्याची उशा !!

**विजय मुलांडे**
**B.Sc. 3rd year**

# खुदगर्ज इंसान

कीतना खुदगर्ज बन गया है ये इंसान ..........
खुदकी सोचता ......बेजुबान को मारता ......
डरता क्यु नई ये इंसान ........

शेर को केहता तु जंगल, शेर को केहता तु जंगल का राजा है,
जंगल खतम कर, क्यु बजाता उसका बाजा है

कीतना खुदगर्ज बन गया ये इंसान ................
हाथी—चीटी के चुटकुले सुनाता है तु खुब......
चीटी काटने पर युही कुचल देता है तु........

रंग बीरंगी तितली बडी प्यारी लगती है ........
पेडो को काटकर उसकी जिंदगी क्या तुझे सुहानी लगती है........

उडते परिंदो, को देखकर, क्या खुब कहावते बनाता है तु............
पिंजरे में बंद कर उसे, लाचार बनाता है तु........

मछली जल की रानी है कहता है तु .....
पानी प्रदुषित करके क्यु उसे तडपता है तु .......

क्यु नही सोचता ये बेजुबान है, सुष्टी की शान है,
धरती का मान,
इतना खुदगर्ज मत बन ये मेरे इंसान ................
इतना खुदगर्ज मत बन ये मेरे इंसान.................

प्रा. अनुराधा पाटील
वनस्पती शास्त्र




**Prof. Anuradha Patil**
**(SET, NET, GATE)**

**Department of Botony**

- ## International Yoga Day:

The International Yoga Day was celebrated on 21st June 2021 by MNG Science College to usher in peace, harmony, happiness and success to every soul in the world. Yoga is a mental, physical and spiritual practice that needs to be carried out every day. Due to pandemic, we conducted online Yoga session for students, teaching staff and non-teaching staff.

Dr. S.S. Battalwar (Director of Physical Education) guided us and explained us the importance of yoga.




*International Yoga Day Celebration.*

## World's Environmental Day:

Department of Botany, M.N.G. Science College, organized the program on World Environment Day on 5$^{th}$ June 2021. This day was celebrated by tree plantation in their respective surrounding areas. Due to Covid-19 restrictions the students were urged to do so.









*World Environment Day Participants.*

- ## Teachers Day:

M.N.G. Science College celebrates Teachers' day every year on 5th September. Students express their gratitude and appreciation for their teachers on this day. This day is dedicated to Dr. Sarvepalli Radhakrishnan – Second President of India. This programme was conducted online due to pandemic.

Prashant Bhaiyyaji Ghotekar (Assistant Professor at Late Bapuraoji Wankar arts and commerce college Khairi) was the chief guest of the programme. He guided on the teacher –student relationship.







*Teachers Day Participants.*

- ## National Science Day:

National Science Day was celebrated in M.N.G. Science College on 28 February to mark the discovery of the Raman Effect by Indian Physicist Sir C. V. Raman on 28 February 1928. For his discovery, Sir C.V. Raman was awarded the Nobel Prize in Physics in 1930.

Online quiz competition for the students was organised by the Department of Chemistry on this occasion.


Matoshri Nanibai Gharphalkar Science College, Babhulgaon

Department of Chemistry

Certificate

This is to certify that **Devyani Buradkar**

For successfully participated in the Quiz Competition on dated 28th February 2021

We salute your efforts keep participating...

Prof. Gayatri U. Gour
Assit. Professor
M.N.G. Science College, Babhulgaon

Dr. A. P. Deshpande
Principal
M.N.G.Science College Babhulgaon

***Quiz Competition Certificate.***

- ## National Librarian Day:

National Librarians' Day is observed on 12th August every year to commemorate the birth anniversary of Padmashri Dr S. R. Ranganathan (1892-1972), who is considered as father of library science in India. As a tribute to his contribution our college celebrates National Librarian Day. Dr. Vandana Khakare, (Librarian, Shri. Shivaji College of Education, Amravati) was chief guest for the programme conducted on zoom online platform



***Chief Guest Dr. Vandana Khakare , Librarian, Shri. Shivaji College of Education, Amravati.***
***Addressing On National Librarian Day.***




*Chairperson Dr. A.P. Deshpande remarks on the occasion of National Librarian Day.*




*Participants (National Librarian Day)*

- ## Convocation:

A convocation ceremony was organised on zoom online platform.
Dr. Milind Apte (founder NRPL Infotech Pvt. Ltd) was chief guest for ceremony. He guided students on future opportunities after graduation.




*Invitation for convocation ceremony.*





*Degree Distribution.*

## College magazine and student board committee

| SN. | Name | Designation | Position |
|---|---|---|---|
| 1 | Dr. A. P. Deshpande | Principal | Chairman |
| 2 | Mr. U. A. Khadse | Librarian | Member |
| 3 | Ms. M. L. Gupta | Assist. Professor | Member |
| 4 | Ms. K. B. Shelke | Assist. Professor | Member |
| 5 | Ms. Divyani Buradkar | Student | Member |
| 6 | Mr. Saiyog Gajabe | Student | Member |

Signature of Principal